दुहरा वहरी

पयलो अंक

३१ मार्च २०१३

# कादोडी

## पास्का हनाव विशेषांक

खाजगी वितरन

अंकाई किंमत (स्वखुशीने) :- दा रुपय

संपादक :- ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८) **Email :-** kadodivasai@gmail.com

संपादक मंडळ :- सायमन रॉड्रिग्ज, सुनील डिमेलो, एडवर्ड डिसोझा, डॅनियल मस्करणीस, राजन डिमेलो, जेम्सन डिमेलो, रॉबर्ट फर्नांडिस, रॉबिन्सन डिमेलो, वॉल्टर तुस्कानो

**Web: -** www.onevasai.com मुद्रक :- मॅन्युएल प्रिंट, वसई पूर्व – ९७६४८७४४९३

## संपादकीय

सगळ्या कुपारी भाआ-बेनी, दादय-बाबा, काका-काकय, मामा-माई, मावशी-मावसो, बाय-फुया, मदरीन-पदरीन, भोटो बाबा-बय आन बारके बच्चे कंपनी, पास्का हनायो शुभेच्छा, परत एकदा आम्ये तुमाला भेट्या आल्याव. आपल्या भाषेत अंक काड्यासाॅ आहा आम्ये गेल्या वहरा ठरविला, त्यानंतर आत्ये यो चौथो अंक हाय. प्रत्येक वेळेला या अंकाला तुम्ये भरभरॉन साथ दिल्ये, आवडीनें वासॉन तोडीस दाद दिले, आमाला त्यामुळे खुब बरा वाटल्ये आन भगून आमे आपल्या भाषेमिने अंक काड्यासाॅ जॉं वसो घेतले तॉं होडनार नाय, पन त्या करता तुमश्या मदतीइ गरज हाय, जास्तीत जास्त लोकांपोत यो अंक पोशव्यासो आमे प्रयत्न करत्याव त्या करता छपाई खर्च पण जाम होत्ये. आपल्या समाजा १३ पॅरीशमिने अंदाजे ८५०० कुटुंबे हात पन या अंकायो २००० प्रतीस काडना शक्य होवात्ये. त्यामुळे या अंकापासून आमे १० रुपय वर्गनी घ्यासो विसार केले, आमसा पयल्यापासून एकुस धोरन हाय ता मनजे या अंकात जाहिराती जास्ती घ्याश्यो नाय कारन मग वाचनीय साहित्य कमी होत्ये, आमश्या या विसाराला तुमे साथ द्या अही तुमाला विनंती हाय.

मागश्या नाताळश्या हनावेळश्या अंकात सिरील मिनेजिसशी "हॅलो, म्ये प्रिन्स बोलात्ये" आन फ्रान्सिस डिमेलो याई "वरांगळो" यो दोन कान्यो तांत्रिक कारनामुळे वाश्याहारक्यो आल्यो नोत्यो त्यामुळे या अंकात परत एकदा आम्ये प्रकाशित केल्यात, सिरील आन फ्रान्सिस अंकलशी म्ये संपादक मंडळावतीने जाहीर माफी मागात्ये, त्या दोगाई आमाला समजॉन घेतला त्याबद्दल त्याये आभार.

"भाषा जगली ते संस्कृती टिकेये" आहा हांगात्यात, गेल्या वहरा पास्का हनादिहा "कादोडी"ऑ पयलो अंक निघालो आन आपल्या समाजात जही क्रांती झाली. या एका वहरात "बारा आने बाटली जाम काम" या आपल्या बोलीभाषेतश्या आजवरश्या पयल्या नाटकाव ३५ वहरानंतर परत एकदा प्रयोग झालो. "कुपारी संस्कृती मंडळ" स्थापन झाला, त्याद्वारे पयलो वयलो "कुपारी महोत्सव" साजरो झालो. "हाऊ ओऊसा तळा" या नवीन नाटका प्रयोगाला सुरुवात झाली. आपल्या पोरांबरोबर मराठी बोलणारे लोक त्याबरोबर आपल्या भाषेत बोल्या लागल्ये. आपली तरुन पिढी जी आपलो पारंपरिक पोशाख जवळजवळ बाहालते(विहारलोते) ते वेगवेगळ्या कार्यक्रमानिमितान घाल्या लागले. अजून आपल्याला बरीस मजल माऱ्याशी हाय आपुन त्या करता प्रयत्न करीत रेव ईस आशा हाय.

ख्रिस्तोफर रिबेलो, सोकाळा

संपर्क / अभिप्राय :- आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान किंवा आपला या अंकाविषयी मत, तुमाला का आवडला, का नाय ता आमाला जरूर कळवा. आमश्या ई-मेल आयडी वर ई-मेल करा नाय ते फोन करा

सूचना:- कादोडी या अंकाव पाचवो अंक संज्यावश्या हनावेळेला, २३ जूनला प्रकाशित होणार. या अंकात तुम्हाला लेख कविता आहा कय साहित्य द्यासा हायदे ते १ जूनपर्यन्त **kadodivasai@gmail.com** मेल करा किंवा संपादक मंडळाला संपर्क करा.

**पास्काव हन सगळ्या वाचकांना खुब आनंदाव आन मजेऑ जाव अह्यो शुभेच्छा**

**या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायदेस आहा नाय.**

# हॅलो मॅ प्रिन्स बॉलातॅ.

इंग्लंडसॉ राजॉ, प्रिन्स चार्ल्स, मुंबयश्या डब्यावाळयांना बॅठयादो मुंबयला आलतॉ, त्या टायमाई ई कानी हाय.

डब्यावाळे तुमश्या लक्षात आल्या हायद्यात. डबॅ घॅऑन रेल्वेआ लायनीओर खो-खो खॅळात भॅआत्यात ते डब्यावाळे नाय हा! ये डब्यावाळे ऑफिसश्या लोकांना गराम-गराम जिव्याश्ये डबॅ पोशवित्यात ते डब्यावाळे. त्याना बॅठयादो प्रिन्स आलतॉ ता तूमे पॅपरात वाशिल्या हायदॅ अन टीवीओर बगीले पण हायदॅ. ठीकाण लालबागसॉ नाकॉ. योगायोगान त्या टायमाला तडॅ मींगेल लोप पण हजर हॉतॉ. आतॅ तुमाला वाटॅदॅ "वाये, मींगेल बी कतॅ डबॅ पॉशव्या लागलॉ?". पण ताहा कईस नाय. मींगेलनॅ तडॅ फुटपाथवर कावड उतरविलती अन केळे विक्या बॅहॅलतॉ तॉ. एकदासॉ प्रिन्स चार्ल्स आलॉ. खूप डब्यावाळे जमलोते. जकल्या डब्यावाळयाई ओळख प्रिन्सश्या हरी करॉन द्या लाविलती. मींगेल कवतीकाए नुसतॉ बगीतोतॉ. ओळख परेड खपली. प्रिन्स जा निंगालॉ आन........आन त्या लक्ष फुटपाथश्या त्या बाजूला ऊबॉ अहलॅल्या मींगेलवर गॅला. खोशील्याला पोन्या, बिरविटल्याला खमीस आन डागावल्याला जाकिट, डोख्योरशी तीरकी जाल्याली काळी टोपी ऑहॉ अवतार बगॉन प्रिन्सशे पाय जाग्योरुस थांबले. प्रिन्ससा ध्यान मींगेलश्या पाटीओर गॅला. हॉन्या हारके पिवळेधमाक वेलचिए केळे बगॉन प्रिन्सश्या तॉन्डाला पानी हुटलॉ. आपसुकुस त्याये पावले मींगेलदरी वळाले.

प्रिन्स दरी येता बरोबर मींगेलनॅ वेलचीआ एक कॅळा हॉकलॉन त्या हाता दिला. प्रिन्सनॅ ता गपा-गप खाला. गॉड हाकर वेलचीआ कॅळा खाऑन प्रिन्स भलतॉस खुश जालॉ. त्यानॅ आहा कॅळा आयुष्यात कतॅ खालास नॉता. प्रिन्सनॅ "ई कुहुना कॅळा हाय" आहा इंग्लीश मिनॅ विसारला, पण ता जकला मींगेलश्या डोख्योरनॅ निहारला. मग प्रिन्सश्या दुभाष्यानॅ ई वेलचीआ कॅळा हाय आहा प्रिन्सश्या कानोर घायला. प्रिन्सनॅ हाव-या घती दोन हातात दोन पिकल्याले फनॅ टूकिले अन दुभाषाला मींगेलशे पैशे द्या हांगीले. दुभाषानॅ पाश्शाई नोट काडली अन मींगेलला द्या लावीली; पन नाय. मींगेलनॅ नोट घेतली नाय. त्यानॅ नुसते हात जोडले अन बोयलॉ, " इंग्लंडसॉ राजॉ ऑडया प्रॅमाए आमशे केळे खातॅ, त्यान आमश्या वसईशी शान वाडली. माला पैशे नाका, ई या कुपा-याआ प्रॅमाई भॅट समजा". ई सगळा प्रिन्सला कळला नाय पन दुभाष्यानॅ इंगलिश मिनॅ जकला त्या कानोर घायला. लगेस प्रिन्सश्या डॉळयात पानी आलॉ, त्यानॅ मींगेलला वॅंग मारली आन फाड – फाड दुभाष्याला इंगलिश मिनॅ कय तरी हांगीला. दुभाष्यानॅ लगेस मींगेलसॉ पत्तॉ नावासकट लिवॉन घॅतलॉ. ऑडया मीनॅ ई असनी बोठ्ठि लांब लसक काळी कार आली. प्रिन्स कार मीनॅ बॅहॅलॉ. असता असता कार दिख्याशी रेली. मींगेल नुसतॉ मांगॅ बगीत रॅलॉ.

या गोष्टीला दोन मयने जाले. मींगेलनॅ गावश्या जकल्या मीत्रांना प्रिन्सशी बॅठ कही जालती ता हांगीलता, पन कुनेस त्योर विश्वास ठोयलॉ नाय. जकले हांगात्यात "मींगेल पुडी हॉडॉ नाका". तॉ तरी का करनार, त्या दरी प्रिन्स बॅठल्याऑ कईस सबूत नॉतॉ. पन एकदी घ्यानी-मनी नसताना एक पत्र मींगेलश्या हातात पडला. मीत्र बोयले "बॅंकेई नोटीस हायदॅ". पन ताहा कय नॉता. पाकिटात एक इंगलिश मिनशी कंकोत्री होती. प्रिन्स चार्ल्सश्या लग्नाई कंकोत्री होती ती. सोबतीला एक मुंबई-लंडनसा विमानाआ तिकीट हॉता. सोबत अजून एक शिटी होती (वाजव्याशी नाय हा) ती मात्र मराठीत होती, प्रिन्स चार्ल्सश्या दुभाष्यानॅ लिविलेली. मींगेलला प्रिन्सनॅ लग्नाला बोलविलता. मींगेलसॉ हात आबाला लागलॉ. कंकोत्री अन विमानाआ तिकीट गावश्या जकल्यां मित्राना मींगेलनॅ दावडला. जकल्यां मीत्राए तोंडे कासूली हारके जाले. इंग्लंडश्या राजाआ लग्नाला मींगेल खास पावनॉ म्हणून जानार ऑहॉ गावभर बॉम्बाट पडलॉ.

एकदासॉ तॉ दि उजाडलॉ. दुमीबाय मींगेलश्यो बॅगी भ-याश्या गडबडीत होती. परवासात खादो तिनॅ सामटयो अन करज्यो करॉन दिल्यो. डबॉ भर डुकराआ इंदॅल पण दिला. प्रिन्सला भॅट द्यादो हुकेळे पण बांदॉन दिले. हॉपारश्या बाजारातनॅ दोन नवीन पोने, दोन खमीशे, दोन कब्जे आन दोन काळयो टोप्यो पण हाडल्यो. मींगेलसा लंडनला जासा टाईम जाला ताहा दापुडश्या सुकुर मावलीआ आहा-या पुडॅ एक आमशे बापा आन तीन नमो मरिया भेटविले. मींगेलला पॉरपार नाय, पन गावश्या पॉराईस नाक्योरसा रिक्षा हाडला. टाटा-बाय-बाय जकला जाला आन एकदासॉ मींगेल लंडनवारीला निंगालॉ. विमानतळापर्यंत त्या हरबर सातुकाकाऑ पीटर आन बस्त्याव काकाऑ शिलु हॉतॉ. मींगेल विमानात बॅहॅलॉ आन विमान निंगाला लंडनला.

दुमिबाय जाम कातावलोती. सात दिहा करता प्रिन्सश्या लग्ना गॅल्यालॉ तीऑ नवरॉ, आज दोन मैने जाले तरी त्याऑ पत्तॉ नॉतॉ. फोन नाय, पत्र नाय, खबार नाय. तीआ शीतुस उडलोता. माऑ धनी कडॅ हायदॅ? कॉहॉ हाय दॅ? का करत्या हायदॅ? का खात्या हायदॅ? गा नुसतॉ पेतेस हायदॅआ? तीऑ धीर हुटात साललॉतॉ. एक दी तिनॅ विसार कॅलॉ "आज

कय बी करॉन याऑ पत्तॉ लाविलॉस पाय". तीनें उहयाखालशी लंडनवरनें आल्याली कंकोत्री काडली. त्योर एक फोन नंबर हॉतॉ. मर्शीबायश्या पोरिऑ मोबाईल मांगॉन हाडलॉ. नंबर डायल कॅलॉ. खूप खट-पाट केल्योर फोन लागलॉ. पन तडनें बॉलनारॉ महानु इंगलिश फाडतोतॉ. दुमीबायाश्या पदरात कईस पडात नॉता. समोरनें नुसता "हुज स्पीकिंग" ऑडास बॉलातोता. दुमीबायनें धीर धरॉन त्याला वीसारला, "माऑ नवरॉ मींगेल तडें हाया?"
उत्तर आला "तूमे कुन बॉलात्या?" कादोडी आयकीतास दुमीबायला बळ आला. तीनें वीसार कॅलॉ "कादोडी बॉलातें मींजें माऑ नवरॉस!" तिनें फोनवर गाळयाऑ सपाटॉ सुरू कॅलॉ. समोरनें परत आवाज आलॉ "वयने, में मींगेल नाय बॉलें, तॉ आज हाकोटेस लंडनश्या नाईट क्लब मीनें नाश्या गॅलें. ई आयकाता बरोबर दुमीबाय फोन वरुस सुरू जाली "वाये.... या काळा जालालो, नाशा गॅलेंआ, तॉकडया फराकातशी मॅडम बीडम पटविलें वाटातें यानें तडें.
"नाय-नाय, ताहा कईस नाय वैने, तॉ एकलॉस हाय आन खूप मजेत हाय". आवाज!

दुमीबाय वैतागली, "अरे, तॉ मजेत हायरें, पण में सजेत हायती. त्या कोडल्यानें लाज बीज साफ होडलें वाटातें, गांडीआ हॉडॉन डॉख्याला बंदील्या हायदें त्यानें?" समोरनें परत आवाज आलॉ, "वैने ताहा कईस नाय, मींगेल एकदम सज्जन माहानु हाय. "ई तू माला हांगीताआ?, अरे पंचविस पावसाळे काडल्यात त्याहरी में" दुमीबाय आतें जामुस वैतागलोती. तिनें पुडें वीसारला, "ता सगळा रेऑंदे. पण तू कुन बॉलाता?" "वैने, माला ओळखिला नाया, में प्रिन्स चार्लेस बॉलातें!". ई आयकीतास दुमीबायसॉ बोलूस गॅलॉ, ती जहीं एकशिती जाली. तीआ मनात विसार सुरू जाले, "माला वाटला, ऑ लंडनला दोन मैने रॅलें तें आतें मस्तपैकी इंग्लीश-बींग्लिश हीकॉन येदें. पण अडें उल्टा जाल्याला दीखातें. दोन मैन्यात यानेंस प्रिन्सला कादोडी भाषा हीकवीली. आतें ऑ एकदासॉ घारा येऑंदे गा त्याई रायो आन मीठा ऑवाळॉन दीठुस काडतें थांब ! गुणाऑ माऑ नवरॉ"!

(ई कानी काल्पनिक हायु, पण भॉळया-भाळया कतें खरी जें जाली तें एक पन कुपा-याला नवाल वाटया पा नाय)

सिरील मिनेजीस, आगाशी (८८०५०१०९५९)

---

# वरांगळॉ

भाद्वॉ पालॉ आन आश्विन उंगावलॉ तही पासूकाकाइ नीज उडाली. शिताए निंबरे जहे तडकाले, तहे पासूकाका सातीत मुहळे घायले. "अहेस निंबरे जें पडें लागले तें पंद्रा दिहात राटबायो सालू ऑहयद्यात आन मंग में होड्जुप कॅय करनें? राटाला दुहऱ्या कुनाला झूफॉं? पिकाये दोन-शारूस गाडे ऑहयद्यात, पन मा एका बैलाय पिक घराय काहा येदें? एकाला दुहरॉ बैल कडसॉ हाडॉ? आमदा ऑल वायादो नांगराला दुहरॉ बैल क्याव पयरॅव झूपॉआ?" या विसाराय पासूकाका कडीला नुसतॉ भोमडॉ लागलॉतॉ.

काळॉ बैल मारखांडो ऑथॉ खरॉ पन तॉहॉबॉहॉं एकाला दुहरॉ ऑथॉ गणाय. पन त्या इश्रिशानें वॅळुस तही आढली ती ! एक पासूकाका जें होडलॉ तें बी कुनाला नंदरें नॉतॉ दॅखात. पासूकाका पूडें जही मेली माही पन बी कुनाला मॅरें नॉतॉ अॅवॉन देत. पयली पयली नुस्ती मुंडी हासक्यासॉ. आंगोर नॉतॉ कतें येत. पन आतें तॅला का जाल्ता कुनाला माइत, नुस्ता कुन मॅरें गॅला तरी टुकॉन टाक्यासॉ. कॉड्या लॉकांना तॅनें मारला त्याव कय पत्तॉस नाय. लॉकाये गराने तरी कोडे आयक्याशे? त्या दिहा तें त्यानें पासूकाकाला आन इमाकाकयला गावात तॉंड दावड्याशी जागा ठोयली नाय. शिशाखालशा शेंडूऑ पॉर तडनें जातोतॉ, त्या हातात कय हतरी होती. त्या बिशाऱ्याला ऑ कॉडलॉ कॉंहॉं हाय तॉ माइत नॉतॉ. ऑ त्याला बगॉन का भुरकालॉ गा का जाला त्या देवाला माइत. तॅनें जोराय आम्हक मारॉन पाग तोडली, त्या पॉरा मांगे लागलॉ. त्याला हिंगोर टुकीला आन दिला टाकॉन. नशीब पॅंड्या तनाईयोर टाकीला. दगडा राहियोर टाकीलॉसॉ तें पासूकाकोर आन इमाकाकयोर तॉंड काळा करेंशी पाळी येओती. पॉरा कय लागला नाय पन पॉरा तॉंडोर नुस्ती राखेडी पिकली. मॅला घाबारला गनाय. बरा जाला नॅमकॉ पासूकाका भाटातनें आलॉ नातें कय बऱ्याई पाळी नोती. तिगाळास पासूकाकानें ठरविला, या काळतॉंड्याला पाग लाव्याशी. दुहऱ्यास दिहा तॅनें कवडीमॉलात तॅला हॉपारशा कसाया गळी घायला आन एकदासॉ हुटटो पडलॉ.

तिगाळा हुटटो पडलों खरों पन आतें पासूकाकाला डॉख्याला हात लाव्याशी पाळी आली. ऑडॅदी भाद्व्याय कय कामे नोते तव भागला. पन आतें? आतें एकाला दुहरों कडसों आढ्यासों? हॉपारशा विंजारॅला अजुन टाइम हाय. आन बईलायो किमती आयकॉन विंजाऱ्या जाशी बिशात कुनाई हाय. गावकोठारी खुब सवकशी केली, ॲलातॅला खुब हांगीला पन कुनाऑ बैल विक्याशी बातमी त्या कानोर आली नाय. आन अहा करता करता खॅप्पॅन आश्विन उंगवालों.

राती पासूकाका आन त्याई कारबारीन इमाकुमारी (इमाकाकय मिंगुबाबाई कुमारी भगून आख्ख्या गावाई कुमारी) विसार करीत बेहलते.खुब विसार कॅलों पन गाठ कय केल्या हुटली नाय. कईस धागॉदॉरों दिखात नॉतों. ओड्यात इमाकुमारीआ मनात कय आला, ती लोळयो वळता वळता जरा थांब्ली आन पासूकाकाला बोयली,“ आयकात्या में का हांगातें, आपल्या मिंगूकोपतशी जरा भॅठ घ्या ना ! त्यासुदा एका बैलोरूस आलें गनाय. त्याओ काब्रो एकुस आन आपलों पारों ॲकलॉस. धूर बरोबर जुळें दें. जरा जाऑन वीसरॉन तें बगा ना.” पासूकाकानें हाताई टिस्की वाजविली आन तों ताडकन उठलों. त्यानें डोख्योर हात मारलों आन मनात विसार कॅलों, “ इ मा डॉख्यात काहा नाय आला. इ ऑडा जवळसा हॉडॉन माऑ राट कडें कडें फिरॉन आलों. तों इमाकाकयला बॉयलों, “ हा, ऑ वरंगाळों बरोबर जमॅदॅं. हाकोभोटेस जातें. मिंगूकोपातशा पूडॅं ऑ विसार मांडीतें. आतें निशितायशी नीज. में निजातें.” आहा बॉलॉन ते निज्या गेले.

पासूकॉपात निशितायसों निज्यासों बोयलों खरों पन हप्पॅं रात त्याला नीज नाय आली. डॉळ्याला डॉळों लागलों नाय. हाकाबोट हॉतें कतें आन मिंगूकॉपातशा ओट्योर सडातें कतें आहा जाल्ता त्याला. पातेरातशी आयमेरी हॉअॅशा आदीस तों उठलों. अँगातँगा निखाळॉस वेळ घालविलों. जरा पैस पड्या लागला तॉहों ओट्योरसों कंदील विजविलों आन तों गोठ्यात गॅलों. बैला आन भयशा पुडॅं पँडों टाकिलों. आज त्यानें भय थोडी लवकरूस धुयली. काल हानशी तिनें मस्ती केल्ती. दोन वॅळॅई भरली होती भगून थोडी लौकर धॉयाशी होतीस. इमाकाकयनें हॅंनपाण्या आट्पिला. कॉपबर शा कॅलों. एक पांनगों बुझिलों. त्यातसों सउत कुडकों पांनगों आन तों शा पासूकाकानें कॉहॉबॉहों गाठीखाला लोटीलों आन तों मिंगू कॉपातशा घारा निंगालों.

मिंगू कॉपात हाकोबोटे हाकोबोटे थाटॅं हुया लागलोतों. तेरू कुमारी हॅंन भरें लाग्लोती. ऑड्यात तीई नंदार गेली. पासू कॉपात खांदयोर कबज्या टाकॉन येताना तीनें बगीलों. तॅनें कुमारीला बगीला आन बोयलों, “कुमारी का सललें?” “आय, तुमे आले का ? कय नाय ना. दोनशार खेपो पान्यायो आढ्ल्यो गा आन बाबू उठॅं तव बरा हॅंना एकदा आटपॉन टाकितें. नातें यो भई रांडो नुसतों कालों करॉन ठोयत्यात. मंग ता हॅंन आख्खा आंगोर हॉळातें.” तुमसा काहा का सललें ? कुमारी काल बिदवारशा देवळा दिखली नाय ती ? बरे हात गनी ? का विसार कॅल्तों?” तॉड्यात तडनें मिंगू कॉपातनें हाक मारली, “ कॉपात, आज शा लास अडॅं आले का ? कुमारी हातसों शा पॅं वाटातें ! या या... ई कडॅं गेली बरा ? अय हा कडॅं ?”

“कॉपात, तूमें माळीआ तयारीला लागल्या पन दुहऱ्या बैला का कॅलें?” पासू काकानें मिंगू कॉपातशा जहनी घायोरतीस मीठ सोळला. “कॉपात बॉलों नाका ना ! मा आंगाला नुस्ता हॅंव लागातें. तुमाला का हांगों. माऑ हॉन्याहारकों बईल ना, आढ्ल्याला शार वहरे जाले. तू नांगराला घाल गा राटाला झुप. गाडा तें लान्या पॉरानें आखल्यासा. पन पाहाळयात त्या पायाला काहा कूत आला का हांगों. मायो आख्ख्यो आवज्यो केल्यो. सगळ्यो दाडी वाईल्यो तंव पोत बेसखातसों ! आतें खारसनीला बांदयासों, ऑड्यात लंग्या लागलों. तरी में ताबोडतोब काळ्याकाकाला दावडलों. इंबळाऑ दाक्टर सुदा हाडलों. कुनें हांगीला डांब द्या तें डांब सुदा दीलों. पन त्याय शारू पाय लागॅशॅं रॅलें तें रॅलॅस. तों जों आडवों जालों तों परत कय उठलों नाय. माऑ बईल गॅलों आन माये पेखळे साप मोडले. आतें ऑड्यादी त्यास विसारात हाय. आतें मावली कय करदॅं आन ई गाठ हूटॅदॅं तें... नातें....”

ई गाठ हॉड्यादोस में आलें. तुमसों काब्रों ॲकलॉस आन माऑ पारों ॲकलॉस, पन बॉलात्यात ना, “ॲकलों तों अरदों आन दोगे ते शोगे.” आपुन वरांगळों करों आन एकमेकाई नड काडों. मातें घना हीप्ना मीळें नाय. आपुन आपलें वारॅं तहॅं लावॉन घॅव. लानी-बाननी थोडी पूडॅमागें घॅव. थॉडा अँगातँगा हॉयदें पन आपुन समुसरान घ्याव.” पासूकाकानें आहा हांगतास मिंगू कॉपातला शार पाय जालें. “कॉपात, तूमे काहा मा मनाहारका बोयले. तुमशा तॉंडात हाकर पडो. ठरला. आमदा आपलों वरांगळों !” आयकीला.. हा कडे ! कॉपातला शा बी दें गा नाय? कॉपात, बीआ शा सा टाइम जाला नाय...” आहा बॉलॉन तॅनें बिडीआ बंडल कॉपातशा पूडॅं कॅला, आन पॉराला हाक मारली, “पॉरा, सुली पुडशी आग हाडू रॅं....!”

**फ्रान्सिस डिमेलो, दोनतलाव**

# सलाम!

सलाम कुपाऱ्यांनो, तुमा सगळ्यांना सलाम!

ऑफिसात सई करोन दोपारा जिव्या घारा येनाऱ्यांना सलाम,
१२-१२ तास उब्यान डूटी करनाऱ्या शिपवरश्या पोरांना सलाम!

देवळात पुडे-पुडे करोन गावात मारामारी करनाऱ्यांना सलाम,
दख्ख्योर बेहोन वार्ता करनाऱ्यांना सलाम!

नाक्योरशे वडा-पाव खाऑन वेळ मारोन नेनाऱ्यांना सलाम,
यूके- यूएसला बर्गर खाऑन दी काडनाऱ्यांना सलाम!

गटारे तुंबले भगून सरकारला गाळी मारनाऱ्यांना सलाम,
मतदानादिहा सहलीला जानाऱ्यांना सलाम!

गावात मातृपितृ दीनाला भाषणे ठोकनाऱ्यांना सलाम,
बय-बाबायो ३-३ मयन्यायो पाळ्यो करनाऱ्यांना सलाम!

सलाम कुपाऱ्यांनो, तुमा सगळ्यांना सलाम!

आन जमलास ते.....

दऱ्यापोत गाडी नेऑन रॉज जॉगींग करनाऱ्यांना सलाम,
नाक्योर मावरा आढ्या गाडी नेनाऱ्यांना सलाम!

डी-मार्ट ला जाऑन 'शॉपींग' करनाऱ्यांना सलाम,
हॉपारश्या बजारात भाजीन लोंगरे विकनाऱ्यांना सलाम!

नळ सालू ठोऑन दाडी करनाऱ्यांना सलाम,
हरीत वसई-सुंदर वसई अही गोषना देनाऱ्यांना सलाम!

बिऱ्यानी खाऑन माजलेल्यांना सलाम,
एमेन्सित कामाला जाऑन राजकारनात गाजलेल्यांना सलाम!

मार्केटमिने नावाजलेल्यांना सलाम,
जमीनी विकॉन कमाविलेल्यांना (?) सलाम!

१०-१० तोळ्या मंगळसूत्र मिरविनाऱ्यांना सलाम,
बेनटेक्सश्या चेयनिपायी सॉराव मार खालेल्यांना सलाम!

ओट्योरशी लाइट बन ठोऑन वीज वाशविनाऱ्यांना सलाम,
ट्रेनमिनशे पंखे सालू ठोऑन बायार पडनाऱ्यांना सलाम!

कादोडी जगली पाय भगून झटनाऱ्यांना सलाम,
घारा पोरांहरी मराठी बोलनाऱ्यांना सलाम!

सलाम कुपाऱ्यांनो, तुमा सगळ्यांना सलाम!

आन सगळ्यात शेवटी कृती न करता निखळा
बोल्यासान लिव्यासा काम करनाऱ्या मा हांगड्यांना पन सलाम!

** कवीवर्य मंगेश पाडगावकरश्या प्रसिध्द "सलाम" या कवितेआ मांडनिवर आधारित भगून त्या कवीश्रेष्ठाला "कुपारी सलाम!" **

सुनिल डि'मेलो वटार – बारोडी, ९७६७०१५२९७

---

## कादोडी विनोदी कान्यो

** शाळीत मनु ने मार खालो नाय ओहो दि नाय, कते कते बॅटठॉ हाप्ड्यासो, असो.
शाळीत तीहरिया वर्गात झुजू त्यात्सेत्यात हुशार, मनु साप डफर, जुन्या काळात शाळीत बेंच नोते, पाटोर बेह्यासे, मनु झुजुआ मांगे निक्यासो गा जेने करोन गुरजीला मनु धिक्यासो नाय, एकदि गुरजी ने झुजूला प्रश्न विसारलो, झुजू, “सांग आकाशात वीज आणि गडगडाट एकाच वेळी होतो पण आपल्याला वीज पहिली दिसते आणि आवाज नंतर ऐकायला येतो, असे का?” झुजूला कय त्या उत्तर आला नाय, मनुने डोका साल्विला आन हात वरती केलो, गुरुजी जाम खुश जालो, पोरांना हंगाते, “बघा, बघा, मनु किती हुशार झाला, मनू सांग उत्तर” मनु हांगाते, “गुरजी, डोळे पुढे आहेत मनून वीज पहिली दिसते, आन कान मागे आहेत मनून आवाज लेट येतो..गुरुजी ने पक्को धोपिलो परत मनु धर्लोन ..

** गणिता तासाला गुरजीने मनूला ऊबा केला आन हान्गीला, “मनु तू गणितात एकदम डफर आहे पण आज मी तुला एक मी सोपे गणित विचारतो, मनु हांगाते, “गुरजी, मला उत्तर येणार नाई, तुम्ही मला मारायला सुरवात करा. गुरजी हांगाते “हे बघ मनू प्रश्न सोपा आहे, नीट विचार करून उत्तर दे, मी तुला दोन कोंबड्या दिल्या आणि अजून तीन दिल्या तर तुज्याकडे किती कोंबड्या झाल्या? मनुने बोटे मोड्या सुरवात केली आन जाम विसार करोन उत्तर दिला, गुरुजी तुम्ही पहिल्या दोन दिल्या आन नंतर तीन दिल्या तर एकूण माज्या कडे सहा कोंबड्या झाल्या.. गुरुजी नें मनु परत कुटीलों, “मनू, दोन आणि तीन किती?. मनु हान्गातें, “पाच गुरुजी..” मग कोंबड्या कशा सहा झाल्या?. मनु हान्गातें, “तुमी पाच दिल्या आन माज्या मामर्षा दादयनें मला एक गळमुंडी कोंबडी दिली हाई, ती धरून माज्याकडे सहा झाल्या ना.

**नेल्सन डिमेलो, दोनतलाव**

**एक दी निर्मळसो माव मित्र, विल्यम मा दरी आलतो आन माला हांगाते, तुमश्या गावश्या पिटरला माला भेट्यासा हाय

मे(थॉमस) :- विल्यम, आमसो गाव एकदम बारको हाय, दोन घरे.. एका घराला हांगात्यात बंगल्यासा घर आन बियाला हांगात्यात काकाघरसा घर.. दोन्ही घरामिने एकेक पिटर रेत्ये, तुला कुहनो पाय?

विल्यम :- तो बग, बायर होतो, कुवेतला..

मे :- ते दोगे बायर गेलते आन दोगे कुवेतलास होत्ये..

विल्यम :- त्याई बेन मर्शान,..

मे :- दोघा बेंनी नाव मर्शानुस हाय..

विल्यम :- ती सिस्टर झाल्ये ती रे..

मे :- हा, दोगी सिस्टर झाल्यात

विल्यम :- त्याई बी एक बेन हाय ना तिया नाव मिना हाय..

मे :- हा, दोघाना बी एक बेन हाय त्या दोगी आ नाव मिनास हाय

विल्यम :- हा, अरे ती आगाशीला दिले ती रे..

मे :- हा दोघींना आगाशीलास दिले

विल्यम :- त्याव एक बाहा शिप वर हाय बग

मे :- अरे, त्या दोघाव बाहा शिपवरुस हाय

विल्यम :- त्याव बाबा मेले

मे :- दोघाव बाबा मेले..

विल्यम :- त्या बेणवया नाव अंतोन हाय

मे :- दोगाये बेणवये अंतोन नावाशेस हात..

विल्यम :- त्या हाळया नाव गोंडया हाय...

मे :- दोगाये हाळे गोंडयास

विल्यम :- त्याई हाळी सिस्टर हाय

मे :- दोगाय हाळयो सिस्टर हात

विल्यम :- (कपाळोर हात मारीत बोयलो) आते ओडा जकला हाय दे ते पुढे मे का बोलो.. मे निंगाते आते,,

मे :- विल्यम, माला एक हांग, तू नक्की पिटरला भेटया आलतो गा टायीमपास कऱ्या आलतो

**तमू रोज हकोटे पयल्या मिसाला जासो.. एक दी घरा आलो आन त्याई बायकू रोजूला वेंग्यात घेतला आन अल्लामत टुकीला, रोजू खुश झाली, हांगाते, आयकात्या, आज देवळात फादरने शरमाव बऱ्यापैकी दिला वाटाते? बायकूवरती प्रेम करा.. तिला आदराने वागवा..तियो मानसन्मान ठवा आहा?”, नाय ना फादर हांगाते, तुमसो खुरूस तुमालास वायासो हाय मनून मे खुरसा वजान कोडा हाय ता बगीला..

**थॉमस लोबो, अंगाळी – ९५९४९१९८६५**

---

## भुजलेली बांडी

नाताळशा हना दुहऱ्या दिहा आपलों कुपारी मॅळावों भरलॉतों त्याला माई पोरी गेलती. तडे जावॉन आल्योर पोरी माला हांग्यादो लागली, मम्मे मॅळाव्यात आपल्या लोकाई कोडयो वस्तु ठविल्त्यो हांग्यादोस नाका. ओडी मजा आली ना बगॅदोस नाका. खुब बरा वाटला माला. तिने तडे बगिलेल्या सगळ्या वस्तुये नावे ती माला हांगातोती, मा मनात विसार आलॉं, “अय जक्ला होता ला पन “भुजलेली बांडी” नहॅदें.” में पटकनशी मा पोरीला बोयली, या ओड्या सगळ्याबरोबर “भुजलेली बांडी” पावतीला. “भुजलेली बांडी” मीन्जॅ आपली शान. यो शब्द आयकॉन पोरी विसरात पडली. तिने पयल्यांदा यो शब्द आयकील्तो, भगून तीने माला विसारला, “मम्मे, ई कुहनी डिश? में कतॅस आयकिली नाय.” मंग पोरीला हांगता-हांगता मा मन आन मॅ जुन्या काळात गेले.

"पोरे, आमशा काळात हारका खादो-प्यादो नॉंता. कारण जकले भाटात खपॅंशे अन भाटात जा का मिळदॅं त्यावर जकल्यायो उडयो. मार्च-एप्रिलशा मयन्यात पिकलॅलॅं आम्बॅं, शिस, पोपय इस आमशा नंदऱ्या पडॅसा. ताहास या मयन्यात सगळ्या घारा हांज-हाकाळ वालाई भाजीस, पण खादो कतेस कंटाळॉ नाय आलो. ओडा कदो दॉपारशा टायमाला आमे सगळे गावशे पोरे राटोरशी बांडी घ्याशे. (बरा जाला पोरीनॅं राट मीन्जॅं का ता नाय विसारला, कारण मागॅं एकदा वर्गात हिकविताना राट ओ शब्द आल्तो आन मॅं राट समजाविता मा एक झुफान हुटला) आन मंग बांडी घॅवोन आमे जकले पोरे कुणातरी हॅंतात खिरोन हिंगो खुडयाशे. त्यो हिंगो बांडीत घालेशे. वरने मीठा टाकॅसा. बतात हायदॅं तॅं बतात घालॅशे. मंग शेवटी वरने कांबूओ पालॉं घालॉण घॉहाट पॅटव्यासा. हॅंतात, राटाखाला जा-का कसरा-कुसरा मिळदॅं ता जमव्यासा आन बांडी भुज्याशी. का सव लागॅसॉं हांग्या नाका. जोडीला जॅं वारी (हांशापारशी ताडी) हायदॅं तॅं भुजलेली बांडी फाई स्टार हॉटेलशा जीवण्यापेक्षा भारी लागॅशी. ई आन आहास बी कय तरी खावॉन आमे भोठ्ठे जाले.

मॅं पोरीला आख्खॉं इतिहास हांगतोती पण तिला कॉंडा कळाला कुणा गाई. आपल्यो जुन्यो खाशो पद्धती आजशा पोरांना कळॅदो खुब भारी जातॅं. कदो माइत हाय गा, कारण आजशे पोरे पिझ्झा, बर्गर, शायनीज, मॅकडॉनल्ड, सबवे या अहया खाण्याला भूलल्यात. ई आहा खाला मीन्जॅं आपुन खुब भारी हाव आहा त्यांना वाट्या लागलॅं. त्यांना आपला पारंपरिक जुना खाना कसरा वाटातॅं.

आज शिक्षान वाडला, ओब्ड्ये पैशॅं दॅणारी नोकरी मिळाली. जकल्यादरी पैसो जालो मंग पोरे जा हांगॅघात, मांगॅघात ता जकला त्यांना दिला जातॅं. जुन्याकाळी आमाला हॉटेल मीन्जॅं का ता माइत नोता, आज पैशा जोरोर आठ दिहाला हॉटेलमिनॅं जावोन नाय नाय ता खातॅव आन डॉक्टरशे घरे भरत्याव. ई आजशा आयबापांना उमजॅदॅं गा? मॅं खुपशावेळी देवळात बगितॅं बारक्या पोरां हातात लेज, कुरकुरे, बिनधास्त दिला जातॅं पण त्यात वापारलॅलॅं सॉस बारक्या पोरा आंगाई वाट लावीत नाय गा? वर आपुणूस हांगत्याव की आज शिकपान वाडले. पण हांग्यासा कुणाला. समजोन घॅदॅं कुण?.

पोरे! आपल्या वाडवडिलाई गॉड आन रात्याई रोटी खाली, कय वेळेला मिलॉं पण खालो पण हातात बाठली घॅवोन डॉक्टरदरी गेले नाय. आज आपल्यो खाश्यो पद्धती बदलल्यो कतॅं तरी हणावाराला घरात येणारा मटन आज आठवड्यातनॅं तीनदा या लागला, लग्नात तर दोन-तीन दी नुसती मटणाई रेलचेल. या सगळ्या खाण्यापेण्यामुळे आज अटॅक आन कॅन्सरसा परमान वाढलॅं. पोट म्हणून कय बी दळोन सलॅं नाय ना. आतमिनशा मालकानॅं सहन केला पाय ना. एकतर आज हवामान ओडा बदालॅं आन आज आपले पावले वळातॅंत ते मॅकडॉनल्ड, केफसी या दुकानात पण तुमा पोरांना हांग्यासा?. बोलातॅंत ना गाढवाला गोडाई सव का कळ्याशी. जोपर्यंत तुमी सगळ्या जिभेय लाड होडा नात तोपर्यंत वालायो हिंगो, भुजलेले केळे, धापट्यो, पानगो, भुजलेली बांडी ई जकला तुमाला कळॅसा नाय.

मॅं ई सगळा भावणेया भरात बोलातोती आन मा पोरीला ई सगळा पटला. ती बोयली, "मम्मे खरस तू हांगाता ता खरा हाय. आज आमशा पोरांई संस्कृती फक्त खाओ, पियो ओर मजा करो अही जाले. मम्मे आपुन पुडशा कुपारी मेळाव्याला बांडी भुजोन ठवेशी." ई आयकीता खोटी मा तोंडातने आला, "पण त्या करता कुपारी मेळावो एप्रिल मयण्यात ठवॅं लागॅदॅं, वालायो हिंगो तिगाळास मिळघात गा."

**सौ. लुईजा फरगोज, गास**

---

## रजार

माला तुमाला आमे लाने असताना रजार कहे करॅशे ता हंग्यासा हाय. "हांशापारशे कामे मीन्जॅं आंग धुयला, काकडॉं बांधीलॉं, ओडारा कय अभ्यास हायदॅं तॅं कॅला गा हळूहळू आमशा तात्यानॅं वारने कऱ्यादो सुरवात केली. "ज्यानॅं कुनॅं तेस कऱ्या हायदॅं त्यानॅं ओट्योर या, पन त्याव दुहरॉं अर्थ ज्यानॅं कऱ्या नायदॅं त्यानॅं याव नाका अहो नाय." पन नाय बोल्याशी हिम्मत कुनाला हाय?.

असना बोठ्ठा कुटूम. बारक्यापासून तॅं बोठ्ठ्यापर्यंत जकले ओट्योर जमॅशे. ऑटॉं असनॉं बोठ्ठॉं. एक हिंदाळॉं टांगलॅलॉं. कोपऱ्यात ८-१० खुराबायो गुनी. ओबडा लोक जमलॅं ता भ्यासा कडे ? बय, काका, बोठ्ठी दादय हिंदाळ्यात सगळ्या मॅरनॅं बॅहॅशे. काईक जन खुराब्या गुनीवर बॅहॅशे मंग आमाला बॅहॅदो जागा कडशी. आमे आख्खॉं तेस मांडी घालॉणुस. एकतॅं आख्खी दोपार निजॅशे नात ते तेस करताना आमसा का हॉयेसा ता आमसा आमाला माईती. त्यामिनॅं त्या ओट्योरशी माती, ओबडा मच्छर खासा पन बोल्याशी बिशाद नाय. ज्या कुनाला ओट्योर जागा मिळेशी नाय ते आंगळ्यामिनॅं ऊबी अहलेल्या सायकलीवर बॅहॅशे. ओडी आमशा तेसला गर्दी अहॅशी.

आमशा घरशे बोठ्ठे जकले रोज देवळा जाशे त्यामुळे त्यांना हनवार माईती. तहॉं गानॉं घॅवॉन रजाराला सुरवात हॉयाशी. पन तो नुसतॉं तेस गा आमाला पास रहश्ये कमी पडॅशे मनून लिटानिया बोलॉन जाली गा मंग घॅ एक आमशा बापा आन नमो मरिया कुना-कुनाला भॅटव्याशे. आमशे पनजोबा खुब आदि मेल्यात त्यान्शा आत्म्याला शांती, त्यामिनॅस आमश्यो बायो-फुये ये सुदधा घ्याशे. आमसो पेद्रु खुब वहरे बायार(दुबई) हॉतो त्याकरता एक पेशल. जकल्या फादर-शिष्टरला एक. आमे मांडी घायलेलीस हाय त्या कुणाला काईस वाट्यासा नाय. इ जकला परवडला पन आमशो भई गावड्या बाळग्या दिल्यात त्यो हारक्यो ज्याकरता एक आमशा बापा आन नमो मरिया.

ओ अहॉं आख्खॉं तेस हॉया पर्यन्त दुहऱ्यो करामती पन खुब हॉयेशो. दादय तेस करतानास सुल्योर ठोयलेल्या जीवनाला घाटान मारॅदो कुनाला तरी आडड्याशी. हाळांब्यात बॅहॅदो आलेल्यो कोंबड्यो कडनेतरी हुरान मारॅश्यो आन मंग त्याव ओब्डो खेव पडेसो. आंगळ्यातने पाववाळा सायकली बेल वाजवित आन आड्डात जासो त्याला ओडा पन कळॅसा नाय की अडे तेस सुरू हाय मनून. त्यातुस कुनतरी भाटशा मोटारी साई द्यादो आलॅ नातॅ न्यादो आले, कदो तर हाकाबोटे भाटात हिप्प्या जासा हाय. नायतॅ कुनतरी मिंगारनॅ दाराई कडी काड्यादो जोराय हाक देतॅ. अहा करीत-करीत आमसो तेस हॉयेसो, नाते तेस करता करता अहा हॉयेसा. एक हांग्यासा रॅला. एकदी तेस सुरू असताना गावात बोंबो-हाको पडल्याव आवाज आलो. तेस होडोन धावॅसा गा नाय इ उमजात नोता. हिंदाळ्यात बेहेलेले दोगी-शोगी धाव टिकीत गॅलॅ पन आमसॉं तेस सालू रेलॉं. पन यामिनॅ आमसा हादला, आमे मांडी घालोन बेहेल्ते ते उठॉन हिंदळ्यात बेहेले. आमे ओड्यातूस जाम खुश.

दिवाळी आन मे मयन्या हुट्टीत हाकोटे आन हानशापारा अहा दोनदा रजार हॉयेसा. पन आमे इ अहा केले त्याई कृपा आमाला मिळाली आन आजपोत मिळाते. वाईट एकास गोष्टीया वाटाते की आजशा पोरांना ओबड्या लाइटीये हजविलेल्या आन मऊमऊ सॉफ्यात पंख्याखाला बॅहॉन पन रजार कऱ्या वाटे नाय. वर हांगिलॅल्ये माय अनुभव त्यांना हांगिलॅ तॅ का बोयले हायद्यात, “त्याला आमे का करो”.

**सुमन मच्चाडो, कोलभाग नंदाखाल**

---

## हिंदाळॉ – एक जुनॉ दोस्त

येला तू गाये... देला तू दूध... बायला माझ्या नीज आले... स्वताई प्रतिकृती वॅग्यात घॅवॉन.. हिंदाळ्यात गानॅ बोल्याशी मजास वेगळी. आपल्या आस्याई ऊब अनुभवित असतानास त्या हिंदाळ्याई साथ पण तोडीस उबदार. हिंदाळॉ.. प्रत्येक कुपाऱ्या जुन्या घरा दापुडशा ओट्योर दिखनारॉ.. सल्तो.. बोल्तो.. हाल्तो... घरसो माहनू. आते काळवेळ बदललॅ भगून आतॅ भोट्टे हिंदाळे, एकदम मॉडर्न शिडशिडीत जाल्यात. कदाचित डायटिंग सो परकार हायदॅ. हिंदाळ्यावरती एक जुनॉ गानॉ हाय पन माला आतॅ आठवॅ नाय... ‘झोपाळ्यावर बसले‘अही काय तरी सुरवात हाय त्याई...

आमसा जुना घर एकदम भोठ्ठा होता. चित्रकार अर्नेस्ट रोड्रिग्सनॅ काडलेल्या चित्राहारका. ऑटो मिंन्जॅ एक लांबलसाक बॅटबॉलसा ग्राऊंड. दरवाज्या बाजूला बोठ्ठो बाक, नक्षीकाम कॅलॅलॉ आन त्याला घोड्या आकाराय बाजूनॅ दोन राखणदार. ओट्या एकाबाजूनॅ दोन मेडीमिने बोठ्ठो हिंदाळॉ. हागा लाकडापासून बनविलॅलॉ. शारी बाजूला नक्षीकाम. एकेक कडी मिंन्जॅ लोखांडाव रॉड. कडी अडक्याव्यादो पितळी वाटी आन खालशा बाजूला पितळीआ नक्षीदार फूल. ‘आये..गाये...बाबू मामा जाये...’ ई हिंदाळ्योर आयकिलॅला मा पयला गीत. आज सुध्धा बारके पोरे रड्या लागले गा हमखास या गान्यानॅ शांत होवू शकात्यात याई हमी अस्सल कुपारी देवू शकातॅ.

तिगाळा शेती मिंन्जॅ मुख्य धनदॉ. गव माहने भाटात्शे आले गा हात्सा सामान ओट्योर ठवॉन, आंगातसा सदरा काडॉन मस्त हिंदाळॉ गाव्याशे. मंग एखादी बिडी पॅटव्याशी. हिंदाळ्या वाऱ्योर मस्त धोर निंग्यासा. यॅस गव माहने राती नवटाक मारॉन आले गा यास हिंदाळ्यात बॅहॉन आख्ख्या गावशी आय-माय काड्याशे. बायकाई हिंदाळ्यात बॅहॅना तिगाळा सलॅसा नाय, ता एक परकारसा बेशिस्त समजला जासा. एक परकारसो सामाजिक अन्याय हॉतॉं तॉं. पावसाळया दिहात हिंदाळ्यात बॅहॉन जिव्याशी मजास वेगळी. मस्त निरल्याव रस आन जोडीला बुंबलाई काडी, वाऱ्याजोडीला आंगाला काटे हाडणारी पाण्याइ झड. का वातावरन होता ता. एसीमिने बॅहॉन पिझ्झा खाताना ता जुना ऐश्वर्य अनुभव्या मिळदॅ गा? नायूस. कते ताटात कालवान आन सपाती घॅवॉन खादो बॅहॅलॅ आन कुनॅ हिंदाळॉ गाविलॉ गा ता कालवान कहा डोलेसा ताटात. जाम भारीस. आख्ख्या सपातीला आपल्या वॅग्यात घ्यासॉं. तहीस हाकोटे केलेली वालाई भाजी हानशापरा शाळीतनॅ आल्योर कडोल्यात धान घालॉन हिंदाळ्यात बॅहॉन खादो... आहाहा. आन नॅम्का त्यास वेळा हिंदाळ्याखाला भुकेले कुत्रे आन कोंबड्यो मान वर

करॉन कय तरी ताटातनें पडॅशी वाट बगॅशॅं. पन तिगाळा कुन टाकीतोता जिवान? नातें आतें.. पोरांपेक्षा गावशे कुत्रे आन कोंबड्याई का तब्ब्यात केले.

मेंडिकोट आन पास-तीन-दोन यॅ पत्त्यामिनशे आवडतें खेळ. हिंदाळ्यात बॅहॉन खॅळॅशॅं. शार कोपऱ्याला शार डोखे आन मिनें टाकॅशे पत्ते. का त्या इस्पिकशा एक्क्याव रुबाब तिगाळा, आत्याशा आमदारालापन यासॉं नाय. कतें कतें या हिंदाळ्याला पन अॅक्सीडेंट हॉयेसा. मिंन्जें अॅखादी कडी पन सरक्याशी. तुट्याशी. आन थोडॅं दी तॉं पन आराम करॅसॉं. कितीतरी वेळा पोरे हिंदाळ्यातनें पडल्यात ई आपल्याला माइतुस हायदॅं. तिगाळा बारोट आन समेळ डॉक्टर नहल्यामुळे पडॉन डॉख्याला आलेल्या टॅबुराला सॉळॉन सॉळॉनुस इलाज हॉयेसॉं.

अहॉं यॉं हिंदाळॉं जॉहॉं सुखाव साक्षीदार हॉयेसॉं तॉहॉं दुखात पन रडॅसॉं. ज्या घारा मरान जालें त्या घरसॉं हिंदाळॉं काडॉन बाजूशा भितीला टॅकवॉन ठव्याशे. आजही ई रित हाय. त्या हिंदाळॅनॅस हांगीला हायदॅं की मा आंगा खांदयोर बोठ्ठो जालॅलॉं, सुखादुखायो वार्ता कॅलॅलॉं, मा जीवा काळजासॉं माहनू आज हॉडॉन गॅलें आन मॅं झॉकॅं कहॅं घ्याव. निर्जीव अहलॉं तरी जीव गॅलॅल्या माहनाव सन्मान करनारॉं हिंदाळॉं....

माला माइत नाय आतें किती घारा हिंदाळॅं रॅल्यात तें. पण यॉं लेख वासॉन आन जमला तें ओट्योर जावॉन एकदा तरी हिंदाळॉं गावा आणि त्याला हांगा "आय लव यू, डियर"

**सचिन मेंडिस, बोळींज**

---

## बारशी दारू

फरसू काकाव पॉर दुबईला गॅल्तॉं, आपल्याअडे अही पद्दत होती कि बार(दुबई वैगरे) गॅलॉं गा तडने, टीवी+रेडीओ, गोगल बुटे आन दारूशो बाटल्यो हाड्याशो मिन्जें त्याला कून भॅट्यादो आलॉं गा त्याला एक कॉप (प्याग) दयासा मिन्जें का कि अही दारू आमी पेत्याव आणि पेनारयाला पण वाटॅदॅं कि आज या माहनानें भारी दारू मा तोंडाला लाविली आतें मॅं खूब नशिबवान. अहास फरसू पॉरानें लोकात शान माऱ्याकरता दयासॉं पण त्याव बाबा शांतीनगरशी गावठी दारू प्यासॉं. एक-दोनदा त्यानें त्या बाबालासुधा दिलती पन कय त्याला आवडली नाय. गावठी दारू त्याला झक्कास वाट्याशी. एकदी का झाला? शांतीनगरला दारू पेवोन परत येताना फरसुला त्याव खास मित्र पासु भॅटलॉं. आतें पासु पुडॅं आपली शान दावडली पाय आन त्याव पॉर दुबईला गॅल्तॉं ई पासुलापन कळला पाय गनाय म्हणून यॉं पासुला का हांगातें, पासु तू ऑडॅं दी हॉतॉं कडे? मॅं तुई कोडी वाट बगीतॉतॉं, माव पॉर दुबईला जावॉन आलें आन मस्तपैक्की दारू हाडले? जनू कय अमृतुस... तू पिली तर जहनी सोर्गात हाय अहा तुला वाटॅदॅं... ऑडा आयकिता खोटी पासुआ तॉंडाला पानी हुट्लॉं कारन फरसू त्याला आज सोर्ग दावडनार हॉतॉं... पासु मन खुश हॉवॅदॅं आहास तॉं बोइलॉं मग पासु हान्गातें "करॅं फरसू, मॅं कय साकना घॅवॉं गा? (या खिशात कय पैशॅं नॉतें हा पन फरसूपेक्षा पासु कय कमी नाय ई पासुला दावड्यासा होता) पन फरसू बोइलॉं नाका, "आपुन बुम्बलायो काड्यो भूजॉं, तू मला वरवंट्योर कुट्यादो मदत कर बास"...

अगोदरुस पासु तोंडाला पानी हुट्लॉतॉं आन त्यात बी बुम्बला काड्या नाव हांगतास याव जीव खालावर हॉतें बास. हांगातें फरसू तू जा काम हांगॅदा ता करनें पयली मा तॉंडाला जरा लाव सलू. आहा बोलात या रगडा फरसू घरा आला. फ़रसूनें दुमी आन पॉर घारा नाय याव फायदॉं घॅटलॉं, तो याला हांगातें मॅं काडयो भूजीतें तू जरा वाट्योर ठेस. पासुला ठेसता प्याशी घाई पडलोती म्हणून वरवंटॉं हातोर लागलॉं आन रगात आला तहा फरसू हंगातें, पासु तू हॉल मीनें बॅहॅं मॅं तयारी करतें. मग बाबा फरसूनें हॉल मीनें २ ग्लासे आन दारुयी बाटली व बुम्बलायो ठेशीलेल्यो काडयो हाड्ल्यो आणि बोयलॉं दुमी याशा अगोदर पॅवॉन घॅ, पासुला वाटला खूप दिहानें फरसू हांगडा बकरा मिळालें तर २-४ प्याग मारॉन घॅवॉं, पासुनें माग्सॉं पुडसॉं विसार न करता त्यावॉं प्याग भरलॉं आन तॉंडाला लाविलॉंसुधा. पयलॉं प्याग हॉतॉं मनून घटा-घटा मारलॉं पन ग्लास खपतास तॉं तॉंड नाहीतें बास. पान अमृत प्या मिळातें म्हणून दुहरॉं प्याग भरलॉं. तॉंडाला लाविलें पन कय घशात जाय नाय. तॉंड नाव्हीतें बास. तॉहॉं फरसू हांगातें थांब मा पॉरानें काजू बदाम हाड्ल्यात तें हाडतें थांब, तो घॅवॉन पण आलॉं...

आतें तर पासुला रॅवालास नाय तॉं फरसूला हांगातें करॅं दारू ओडी कडवट कय लागतें? फरसू बोयलॉं, "बारशी दारू ई अहीच अहातें तू पे बास. मॅं शांतीदरशी अर्धी बाटली पिले नायतें, मॅं ई आख्खी बाटली रिकामी केलोशी ई बार्शी दारू हाय. जरा सावकाश पे हा. थोडी कडवट पन लागॅं दॅं !! तू ग्लास भर बास आन अही वेळ परत येनार नाय जहा ताहा पासुनें ता ग्लास पिला. बी पाय गा? आतें मात्र पासुला तडने पळातें काते अहा जाला, उलटी येतें बास. फरसू बोइलॉं का रॅं का जाला? प्या ना

तॉ? तर पासु हांगातें तू साकना हाड जाय. फरसू जाताच पासुनें दार उगडॉन आंगळ्यात उलटी केली. फरसूला वाटला याला दारू सडले. पासु हांगातें, फरसूआ कडवट ठीक हाई रॅं पन आंबट लागतें ती? में आतें घरा साल्लों तहॉबहॉ पासुनें तॉंडोर हात ठॉवॉन पळ काढलॉ... फरसू बोइलॉ तू परत आयतवारे ये हा, ई रेलेली पुरी बाटली आपुन खाली करॉ.....

हन्सापरा फरसू पॉर मुबईतनें घारा आलॉ. आतें आपली वाट लागेंदें म्हणून फरसू नें विसार कॅलॉ. पॉराला हांगॉन टाकॉ, पॉरा मा दरने एक सुक जाली. पॉर बोईलॉ, "का रे बाबो?" "तू बार्शी जी भारी पैकी दारू हाडलोती ती में थोडी मा मित्राला (पासुला) दिली. बाबो कुहनी रॅं, ब्लाक लेबल गा रेड लेबल? गा शीवास रिगल? तर फरसू बोइलॉ ता मला कय कळें नाय... तुला दावडतें सल, पन तांबडी कुहनी तरी ती दिली, आपल्या सुलीपुड्शी. फरसूनें सुलीपुड्शी ती अर्धी बाटली हाडली. पॉरानें कपळावर हाथ मारलॉ आणि हाव्या लागलॉ... बाबो ई दारू नाय... यॉ चायनीज शा जीवनात टाक्यासॉ सोयासॉस.... फरसू हांगातें; म्हनुनुस पासु पॅताना तॉंड नाव्हीतॉतॉ, गा? आतें मला कळला रॅं. परत तो कय आयत्वारें प्यादो येदें आहा मला वाटें नाय.

रॉबर्ट फर्नांडिस, मर्देस

---

# मायबोली दिन

२१ फेब्रुवारी ओ दी आख्या जगात मायबोली दिन मनून साजरो केलो जात्ये, या वहरा २१ फेब्रुवारी या दिहा "अनाम प्रेम" या संस्थेनें केळवा रोडला "श्रेयस रेसिडन्स"ला एक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केळतॉ. या कार्यक्रमात वाडवळ, आगरी, मालवणी, कोळी, माच्छी, फुदगी, धोडी, मायेली, बारी, भंडारी, वैती आन आदिवासी कार्यक्रमाबरोबर "कादोडी" भाषेत पन कार्यक्रम सादर जालॉ. आगायश्या सिरील मिनेझीस अन त्या हॉकऱ्याने "बंड्या आन मास्तर" ही स्किट सादर केली. प्रेक्षकांइ इ स्किट अक्षरश्या डोखेंओर घेतली ऑडास नाय तर बोरिवलीश्या सौ. गुलाब तुस्कानो अन गाहातशा सौ. तेरेजा डिसोजान्ये कादोडी भाषेत ठसकेबाज गानो बोयलो. या निमित्ताने सगळ्या कादोडी प्रेमींना एक सूचना हाय, ज्या ज्या घरात मराठी भाषा अंगवळणी पडलें अह्या लोकांई २१ फेब्रुवारी इ तारीख लक्षात ठोयाशी आन निदान त्या दिहातरी कादोडी बोल्यासॉ प्रयत्न कऱ्यासॉ. आपली मायबोली जगव्यासॉ प्रयत्न करा, ऑहॉस संदेश या कार्यक्रमातनें "अनाम प्रेम" या संस्थेनें जकल्यांना दिलॉ. कादोडी भाषा या कार्यक्रमात पोशव्या करताना सौ. वेरोनिका लोपीस, नंदाखाल आन श्री. सायमन रॉड्रिग्ज, आगाशी याई विशेष मदत झाली.

सिरील मिनेझीस, आगाशी

---

## अंकाकरता देणगी

ॲलेक्स गोन्सालवीस – बोरीवली – १००० रु.

सि. हिल्डा कोरिया – नांदाण – ५०० रु.

मम्मी-पप्पा लग्नाव वाढदिहाकरता ॲवेलीन कोरिया – नांदाण – ३०० रु.

मायकल फ्रांसिस डिब्रिटो – वनराई- गुराडे – १०० रु.

सुनिता आग्नेलो आल्मेडा – सोकाळा – १०० रु.

## स्वेच्छा मूल्याद्वारे जमा झालेले पैशे

घोसाळी - १०१० रु.

कुपारी महोत्सव विक्री – ८६५ रु.

दोनतलाव – ५०० रु.

ऊंगणभाट – २५० रु.

अर्नाळा – २०० रु.

सोज आळी – ७० रु.

माआ कादोडी मित्रांनो आन भाआ बेन्यांनो
‘हाऊ ओसा तळा’ बगीला एकदा ‘पटाळया तळा’’ बगॉन घ्या

# अथर्व आयुर्वेदिक पंचकर्म केंद्र

अथर्व मेडीकल फाऊंडेशन मुंबई पब्लीक ट्रस्ट संचालित

पटाळया तळा ,ऊंबरगोठण नवापूर रस्तॉ,पो . आगाशी ,विरार प .

- आयुर्वेदिक ऊपचाराऑ फायदॉ सावकाश पान हमखास हॉतॅ . पयले ऊपचार माग वाटात्यात .
- आयुर्वेदिक ऊपचाराये ॲलोपॅथी ऑखान्दाघतीन साईड इफेक्टस हॉत नाय .
- आपल्या कॅन्द्रात ९० टक्के हार्ट ब्लॉकेज ,पॅरालिसिस,बॅक पेन, हांदे दुखी ,मुळव्याध थायरॉईड सायटिका अहलेले अहे कितीतरी पेशंट गॅल्या वहराभरात बरे जाल्यात .
- ज्येष्ठ नागरीक ,समाजसेवी संस्था,गरजवंत याकरता २५ टक्के सवलत देत्याव

कयबी माइती विसारॅ हायदॅ तॅ आडॅ बेलाशक फोन करा .९०४९५६७२४१ , ९१४६४८३४१९
हांबोडीतसॉ बर्नड लोपीस आन मॅरभाटसॉ तॉमास लोपीस ये दोगे अथर्व मेडीकल फाऊंडेशनशा तरफ्यॅ जकली व्यवस्था बगीत्यात
ई जायरात नुस्ती वाशाकरता दिली नाय ई काळाई गरज हाय भगून डॉख्यात ठवा
जकल्यांना इष्टरशा हनायो ‘टॉक्सीन फ्री’ शुभेच्छा !

---

सहामाही स्मृती

ख्रि. जॉना अंतोन रॉड्रिग्ज

अटोळी – नानभाट

जन्म :- ११ फेब्रुवारी १९३५ मृत्यू :- २६ सप्टेंबर २०१२

आणि

ख्रि. शांतियाग डिमोन्टी

माडीभाट – आगाशी

जन्म :- २२ सप्टेंबर १९५४ मृत्यू :- १६ मार्च २०१३

शलमोनाचा ज्ञानग्रंथ ४:७ :- नीतिमान मनुष्य मरण पावला तरी तो शांती पावेल

देणार :- श्री. अंतोन गोट्या रॉड्रिग्ज

अटोळी – नानभाट

# सर्वांना इस्टर सणाच्या हार्दिक शुभेच्छा

THINK TRAVEL, THINK NITIN
NI3'S
TRAVEL POINT

1) वेलंकनी 5 दिवसाचा नोव्हेंना - 2 सप्टें. २०१३ ते ९ सप्टें. २०१३
   डिलक्स ए.सी. रूम्स व परतीचा प्रवास विमानाने
   प्रौढांसाठी रु. १२५००/- आणि मुलांसाठी रु. ११५००/-

2) केरळ दर्शन दि. ५ नोव्हें. २०१३ ते १३ नोव्हें. २०१३ (दिवाळी सुट्टी)
   कोचीन – मुन्नार – टेक्कडी – पेरियार – त्रिवेंदम - कन्याकुमारी
   मुंबई–कोचीन ३ ए. सी. ट्रेनने, डिलक्स हॉटेल स्टे, २ X २ लक्झरी बसने साईट सीन, नॉनवेज जेवण व त्रिवेंद्रम-मुंबई विमान प्रवासासहीत, प्रौढांसाठी रु. १७०००/- आणि मुलांसाठी रु. १५०००/-

3) साऊथ हनिमून पॅकेजेस - केरळ कन्याकुमारी मुंबई कोचीन ट्रेन प्रवास, ३ ए. सी.
   ६ रात्री डिलक्स हॉटेल स्टे विथ कॉम्प्लिमेंटरी ब्रेकफास्ट
   १ रात्र हाऊस बोट स्टे विथ फूड
   त्रिवेंद्रम मुंबई एयर फेयर आणि इंडिका गाडी स्टेशन पिकअप आणि एयरपोर्ट ड्रॉप

4) बंगलोर-म्हैसूर-उटी - मुंबई बंगलोर मुंबई विमान प्रवास ६ रात्री डिलक्स हॉटेल स्टे विथ कॉम्प्लिमेंटरी ब्रेकफास्ट, इंडिका गाडी बंगलोर एयरपोर्ट पिकअप & ड्रॉप
   कपल्स साठी ४५०००/-


संपर्क

नितिन लोपीस

ग्रेस पॅलेस, भाटी – नानभाट

9762355060 / 9224159732 / 8007846010 / 0250-6928487

आमच्या कोणत्याही प्रोग्रामसाठी

Ni3.lopes@gmail.com